महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र.३७४(२)/विद्युत/२०१९/१४-ब** **दिनांक- १२ जुलै, २०२१**

## -:प्रसिद्धीपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ निकाल प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १८/२०१९.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक अभियंता, विद्युत, गट-ब, श्रेणी-२ संवर्गातील १६ पदावरील भरतीकरिता दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक २३ जून, २०२० रोजी जाहीर करण्यात येऊन, दिनांक १० व ११ सप्टेंबर, २०२० या कालावधीमध्ये संबंधित उमेदवारांच्या मुलाखतीदेखील घेण्यात आल्या आहेत.

**२.** दरम्यान, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या सिव्हिल अपील क्र. ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक. ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२०/प्र. क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित असणारी पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित करून संबधित परीक्षेचा निकाल सुधारित करणे क्रमप्राप्त ठरते.

**३.** प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित केल्यानंतर विषयांकित परीक्षेतून भरावयाच्या पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षण | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ३ | १ | -- | १ | -- | -- | ५ | -- | २ | १२ | ४ | १६ |
| रिक्तजागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खलीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | -- | १ | -- | -- | ३ | -- | १ | ८ | ३ | ११ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | ४ | १ | ५ |
| दिव्यांग | एकूण पदे २-(१) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू -१(२) श्रवण शक्तीतील दोष-१ | | | | | | | | | | | |

**४.** उपरोक्त पदसंख्येच्या आधारे महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ करीता निकाल प्रक्रिया राबविण्यात येईल.

**उपसचिव, परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**